क्र.प्राअवि/एन.सी.टी.ई./२००४-०५/३४-ट
महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन
व प्रशिक्षण परिषद, पुणे-३०
दिनांक :-~~१५-७-२००४~~
१६-८-०४

प्रति

प्राचार्य,
इकरा एज्युकेशन सोसायटी,
इकरा नगर, शिरसोली रोड,
जळगाव - ४२५००१.

विषय :-**सन २००४-०५ या वर्षाकरिता नवीन अध्यापक विद्यालयास एन.सी.टी.ई. ची मान्यते बाबत**

प्रादेशिक संचालक, राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद, पश्चिम क्षेत्रीय समिती, भोपाळ यांनी आपल्या अध्यापक विद्यालयास सन २००४-०५ या शैक्षणिक वर्षासाठी मान्यता दिलेली आहे. तथापि आपल्या अध्यापक विद्यालयात कार्यरत असलेले प्राचार्य व प्राध्यापक यांची माहिती शिक्षण उपसंचालक यांच्याकडून प्रमाणित करुन व त्यावर संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे - ३० यांची प्रतिस्वाक्षरी होऊन त्यास एन.सी.टी.ई. ने मान्यता दिल्यानंतर आपल्या अध्यापक विद्यालयास अंतिम मान्यता देण्यात येईल. अंतिम मान्यता मिळाल्या शिवाय आपण आपल्या स्तरावर व्यवस्थापन कोटयाअंतर्गत प्रवेश देऊ नये. एन.सी.टी.ई. भोपाळ यांनी विहित केलेल्या निकषांचे तंतोतंत पालन होईल याची दक्षता घेण्यात यावी. आपल्या अध्यापक विद्यालयास अंतिम मान्यता प्राप्त झाल्यानंतर व्यवस्थापन कोटयातील प्रवेश करण्यासाठी संबंधित जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेशी संपर्क साधावा व त्यांच्याकडून आवश्यक ते मार्गदर्शन घ्यावे.

सहसंचालक
महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन
व प्रशिक्षण परिषद, पुणे-३०.

प्रत-

१. मा.सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२ यांना माहितीस्तव सादर
२. विभागीय शिक्षण उपसंचालक, नाशिक. विभाग नाशिक....

उपरोक्त संस्थेस एन.सी.टी.ई. कडून सन २००४-०५ साठी शैक्षणिक वर्षात शिक्षकांची यादी प्रतिस्वाक्षरी करुन पाठविण्याच्या अटीवर तात्पुरती मान्यता दिलेली आहे. संस्थेने त्यांनी चालविलेल्या अध्यापक विद्यालयात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची यादी आपल्याकडून कृपया स्वाक्षरी करुन परिषदेकडे पाठवावी. अंतिम मान्यता देण्याच्या दृष्टीने पुढील कार्यवाही करता येईल. सदर संस्थेच्या प्राचार्यांना त्यांच्या अध्यापक विद्यालयात प्रवेश करण्याबाबत शासन निर्णय टीसीएम/२००३/(८३/२००३)/माशि-४, दिनांक ७ मे २००४ मधील तरतुदीच्या अधीन राहून प्रवेश करण्यास त्यांना योग्य ते मार्गदर्शन करावे तसेच हा शासन निर्णय निर्गमित केल्यानंतर परिषदेने ज्या वेळोवेळी सूचना दिलेल्या आहेत त्या सूचना संबंधितांना द्याव्यात.

३. प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांना वरील प्रमाणे पुढील कार्यवाहीसाठी.

GB.६.२५